सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

संदर्भ क्र. विविमं/२०२५-२६/११ दिनांक : १२/०६/२०२६

प्रति,

मा. प्राचार्य / मा. संचालक

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी सलंग्न

असलेली सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये राबविलेल्या योजनांचे अहवाल पाठविणेबाबत....

महोदय / महोदया,

राष्ट्र विकासाच्या दृष्टीने विचार करता देशातील तरूण सक्रीय व सक्षम बनविणे, त्यांच्या विकासाला चालना देणारे उपक्रम राबवणे महत्त्वाचे ठरते. देशातील युवा लोकसंख्येवर लक्ष्य केंद्रित करून देशातील विद्यार्थी विकासाला चालना दिले जाते. याच विषयाला अनुसरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळामार्फत कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, निर्भय कन्या अभियान, तसेच विद्यार्थी हिताचे सांस्कृतिक, व्यक्तिमत्त्व विकास, कौशल्य विकास, आपत्ती व्यवस्थापन, आणि इतर रोजगाराभिमुख, बहुविध कल्याणकारी योजना राबवित असते. विद्यार्थ्यांना व्यक्त होता यावे यासाठी नियतकालिक, विद्यार्थी वार्ता असे अनेक उपक्रम राबवित असते. असे उपक्रम विद्यार्थ्यांना दिशा देण्यास निश्चित उपयोगी ठरल्याचे दिसते.

काळानुरूप आणि गरजेनुसार यात बदल करून नाविन्यपूर्ण उपक्रम आयोजित करण्याकडे विद्यापीठाचा कल असतो. विद्यापीठाबरोबरच संलग्न महाविद्यालयांमध्येही कमवा व शिका योजनेबरोबर अनेक वैविध्यपूर्ण कार्यशाळा आणि उपक्रम आयोजित केले जातात. अशा उपक्रमांची नोंद घ्यावी व भविष्य काळात असे नाविन्यपूर्ण उपक्रम घेण्यासाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी हे उपक्रम अहवाल आपण पुस्तक रूपाने प्रसिध्द करत आहोत. या उपक्रमांमध्ये आपल्या महाविद्यालयाचा सहभाग असावा यासाठी आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास मंडळाने आयोजित केलेल्या उपक्रमांचा सविस्तर अहवाल सोबत दिलेल्या लिंकवर भरावा. आपला प्रतिसाद आणि सहभाग पुस्तकरूपाने आपल्या सर्वांसोबत कायम राहिल.

तरी आपल्या महाविद्यालयात/परिसंस्थेत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विद्यार्थी विकास मंडळाच्या राबविलेल्या प्रत्येक / सर्व (विद्यापीठामार्फत अर्थसाहाय प्राप्त तसेच विद्यापीठाकडून अर्थसाहाय प्राप्त नसलेल्या परंतु महविद्यालय निधीतून राबविलेल्या) योजना व उपक्रम निहाय अहवाल रूपी माहिती **(दोन फोटो (प्रत्येकी २ MB पर्यंत) १. विद्यार्थी सहभाग असलेला २. स्टेज वरील अथवा वृत्त पत्रात प्रसारित बातमी)** खाली दिलेल्या लिंकवर ऑनलाईन पद्धतीने (www.unipune.ac.in – BOD Online – Login - students development – menu – Scheme Book) या लिंकवर **मंगळवार दिनांक २३ जून २०२६ पर्यंत भरणे व अपलोड** करणेबाबत संबंधिताना सूचित करावे. कळावे, हि विनंती.

(डॉ. सविता कुलकर्णी )

संचालक, (अतिरिक्त कार्यभार)

विद्यार्थी विकास मंडळ